International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# संत गाडगेबाबा यांचे समाजीक कार्ये

**डॉ. सुजाता रामदासजी नाईक**

समाज शास्त्र विभाग प्रमुख, कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरब, ता. दारव्हा, जि. यवतामळ

## प्रस्तावना

महाराष्ट्रात संत गाडगे महाराजांच्या कार्यामध्ये प्रामुख्याने समाजातील जनजागृती कार्यक्रमांची सुरुवात केली. तसेच त्यांनी गृहत्याग ते कीर्तनाच्या आरंभापर्यत सामाजिक प्रश्नाचे अवलोकन आणि समाजात सामाजिक प्रश्नाचे कीर्तनाद्वारे प्रबोधनाचे कार्य केले. त्यांचे कार्य हे सामाजिक, आर्थिक घटकांआधारित आहे. तसेच बाबांनी सामाजिक स्वयं विकास साध्य करण्यासाठी अंधश्रद्धेस प्रतिबंध घालण्यासाठी लोशिक्षणाची एक चळवळ सुरु केलेली आहे. त्यानुसार या प्रकरणात संत गाडगे बाबांच्या कार्याचा मानवतावादी दृष्टीकोन स्पश्ट होण्यास मदत ठरु शकते.

संत गाडगे बाबांनी निरोगी व स्वच्छ समाजासाठी आपले आयुष्य वेचले आहे. माणूस आणि मानवतावादी माणूसकी हा त्यांच्या समाजकार्याचा केंद्रबिंदू होता. अतिशय खालच्या माणसाचा सर्वांगिण विकास झाला पाहिजे हा त्यांचा मानवताधर्म होता. गाडगे बाबांच्या आचार, विचार आणि उच्चाराने नटलेली ही गाडगेबाबांची भ्रमणगाथा म्हणजे सामाजिक कार्याची सुंदर दर्पणपेटीच. सर्व समाजाला जीवनाच्या आवघड वाटेवर ही गाडगबाबांच्या कार्याची शिदोरी पुरुन उरेल असे वाटते.

## जीवन परीचय

आपल्या नावापेक्षा गाडगे बाबा आणि संत गाडगे महाराज या नावाने अधिक सुपरिचीत झालेले एक थोर समाजसुधारक म्हणुन आज देखील आदराने ज्यांचे नाव आपल्या ओठांवर येते ते संत गाडगे महाराजांचे.

त्या काळी भारतीय ग्रामिण समाजात मोठया प्रमाणात त्यांच्या प्रयत्नांमुळे बदल घडुन आला. आज देखील अनेक राजकिय पक्ष आणि सामाजिक संस्था त्यांच्या केलेल्या कार्यातुन प्रेरणा घेत आहेत.

गाडगे महाराजांचा जन्म अमरावती जिल्हयातील शेणगांव येथे अंजनगाव सुर्जी तालुक्यात एका परिट (धोबी) परिवारात झाला. गाडगे महाराजांचे बालपण मुर्तिजापुर तालुक्यातील दापुरे या त्यांच्या मामांच्या गावी गेले. त्यांच्या मामांची खुप मोठी शेतजमीन होती. तेथे काम करायला विशेषतः गुरे राखायचे काम त्यांना फार आवडे.

गाडगे महाराज चालते फिरते सामाजिक शिक्षक होते. आपल्या मुलीच्या जन्मानंतर आप्तेष्टांना त्यांनी मांसाहाराचे जेवण न देता गोडाधोडाचे जेवण दिले. हा त्या काळी केलेला फार मोठा बदला होता. पायात तुटकी चप्पल, डोक्यावर फुटके गाडगे, अंगात चिंध्याचिंध्यापासुन बनविलेला पोशाख असे पायी फिरणारे व्यक्तिमत्व गाडगे बाबा.

## गाडगे बाबांची समाजीक कार्ये

### अंधश्रद्धा निर्मूलन

गाडगे बाबांनी अंधश्रद्धेविरुद्ध आवाज उठवून ठिकठिकाणी चालत आलेल्या पशुपक्षांचे बळी घेतल्या जाणाऱ्या आघोरी प्रथा कायमचा बंद केल्या. हजारो लोकांनी त्यांचा उपदेश ऐकून हिंसा करणे सोडून दिले.

देवाधर्माच्या नावाखाली सामान्य लोक वाईट चालीरितींचे अनुकरण करतात. नवस-सायास आदी कारणास्तव अंधपणाने पशुपक्षांची हत्या करतात. गोरगरीब माणसाच्या मदतीसाठी पुढे येण्याऐवजी लोक तिर्थयात्रेसाठी अमाप पैसा खर्च करतात. यातमून काहीच साध्य होत नाही. तीर्थयात्रेला जाणे म्हणजे पैशाची धुळधानी कारणे आहे. कोणत्याही तीर्थाला गेले तर तेथे दगडाचा देव आहे. लोक दगडाच्या देवाची भक्ती करतात, पण वंचित, गरीब, दुःखी

माणसास कुणी मदत करीत नाही म्हणून गाडगे बाबा लोकांना आर्थिक प्रबोधीत करतात. अंधश्रद्धेचा निशेध करतात. एखादे वास्तव, कटूसत्य लोकांसमोर मांडताना ते निर्भिड वाईट गोष्टींवर हल्ला करुन पोट भरणाऱ्या देवांचा बाजार आपल्या देशात भरलेला आहे. आणि ही सर्व तीर्थस्थळे सामाजिक, आर्थिक शोषणाची केंद्र आहेत. असा मोलाचा विचार लोकांना देतात व सामाजिक, आर्थिक प्रबोधन करण्याचे कार्य करुन समाजाला योग्य तो मार्ग आचरणात आण्याचा उपदेश करत होते.

**गाडगे बाबांचे शिक्षणासंबधी विचार**

गाडगे बाबांच कीर्तन म्हणजे लोकशिक्षणाचे विद्यापीठ. हे विद्यापीठ सर्वांग ज्ञानाचे परिपूर्ण होते. जनमानसातील विषय अभ्यासणे व त्यांची भाशाषैली सरळ व सोपी होती. या विद्यापीठाचा उद्देश 'शिका आणि शिकवा'. या शिक्षणात अध्यापन, अध्ययन यांच्यामधील सुसंवाद आणि मनोरंजनाचे धडे. शिक्षक शाळेत प्रश्न-उत्तराचा जसा तास तसा बाबांच्या कीर्तनात प्रष्नोत्तराचा मनोरंजानाचा पाठ, समोरच्या माणसाला व अध्ययनकर्त्यांला प्रश्न विचारण्याची व मत मांडण्याची संधी होती. त्यामुळे उत्तर शोधण्यासाठी सोपे होत होते व शिकवण्यामध्ये मनोरंजक जुगलबंदी होत होती. त्यामुळे सामान्यातल्या सामान्याला संप्रेषण साधण्याची दिशा मिळत होती. बाबांच्या कीर्तनात शिक्षणाबरोबर समाजसुधारकांचे कौतुक आणि गौरव.

1937 साली नाशिकच्या नगरपालिकेच्या भव्य मैदानावर बाबांचे कीर्तन झाले. कीर्तनाला सर्व वर्गातील श्रोते उपस्थित होते. श्रोतावर्गातील कुणी हौसी, नवसी आणि गौसी या प्रकारचेही श्रोते उपस्थित होते. बाबांच्या कीर्तनातीला विषय 'शिका आणि शिकवा' बाबा तन्मयतेने सांगत होते, 'बाप हो! विद्या हे मोठं धन आहे. शिक्षणमुळे माणूस , माणूस म्हणून जगू शकतो. बिनशिकलेला माणूस आणि जनावर दोन्हीही सारखेच. शिक्षणामुळे माणसाचे जीवन फुलते. आपण कोण आहे हे कळते. आपण काय केले पाहिजे ते समजते. शिक्षणाचे संस्कार झाल्याशिवाय माणसाला माणुसकी येत नाही. महात्मा ज्योतिबा फुले हे तळागाळाच्या माणसासाठी झटणारे खरे तळमळीचे समाजसुधारक आहेत. त्यांनी आपली पत्नी सावित्रीबाईंना आधि शिक्षण दिलं आणि मुलींची शाळा काढली. शिक्षणाशिवाय पर्याय नाही. "शिका आणि आपल्या मुलाले शिकवा" बाबांचं कीर्तन संपल्यानंतर एका सुज्ञ सुशिक्षिताने बाबांना काही प्रश्न विचारले. कदाचित त्यांना महात्मा फुल्यांचा गौरव रुचला नसावा. ते थोड्याशा पोटतिडिकीने म्हणाले,

'आपण कुठं शिकलात?'

"मायबाप, मी सडकेच्या शाळेत आणि दुनियेच्या विद्यापीठात शिकलो."

"मग शिक्षणाकरिता शाळेची जरुरीच काय?"

"तुम्ही शाळेत अन् कॉलेजात शिकला ती खरी विद्या. तिनं माणसाला माणूसपणच काय पण देवपणसुद्धा येते. ती नसल्यामुळे मले तुमच्या या लेकराला माणूसपन आलेच नाही. महणून जनता जनार्दनाचं विद्यापीठ केलंय अन् इथं शिकतोय. तिथं डिग्रीवाला बिनडिग्रीवाल्याला कमी लेखत नाही. वरच्या जातीचा खालच्याला दूर लोटत नाही. माणसानं माणसाला कमी लेखावं यासारखा अधर्म नाही मायबाप!"

खरं आहे! सुशिक्षिताचा ताठा असलेला तो सुज्ञ खाली येऊन गाडगे बाबांची क्षमा मागू लागला व निरुत्तर होऊन बाबांना नमस्कार करुन ते गृहस्थ निघून गेले. असा बाबांचा विद्यापीठातील प्रश्नोतरांचा तास.

**हुंडाप्रथेचा विरोध**

लग्न कार्यात वर पक्षाने किंवा वधूपक्षाने हुंडा किंवा दहेज देता कामा नये. असा प्रचार त्यांनी कीर्तनातून सतत केला. जो कोणी हे पाप करील त्याच्या लग्नाला कोणी जाऊ नये, बहिश्कार घालावा. हुंड्याच्या या प्रघाताने दोन्ही कुटुंबे कर्जबाजारी होतात. शेती गुराढोरांना विकून सावकाराचे दास बनतात. नवविवाहित जोडप्याचा नवा संसार कर्जाच्या उकीरड्यावर चालू करणे महापाप आहे, आत्मघात आहे. लग्नासाठी सावकाराचे कर्ज काढून गावजेवणाचा, आरसपरस आहेराचा नकली श्रीमंतीचा खोटा थाट करण्यापेक्षा, गरीबाला साजेषोभेशा कमी खर्चात तो साजरा करावा.

गाडगे बाबांनी हुंडा प्रथेचा कडाडून निषेध केला. (नॅशनल क्राईम रेकार्डस ब्युरो, 2005) च्या अहवालानुसार प्रत्येक 77 मिनिटांनी हुंडा बळीची घटना घडते.

## आर्थिक समतेचा संदेश

हजारो वर्षे समाजाच्या आर्थिक अधिसत्तेखाली बहुजन समाजाला भरडून निघालेला आहे. गाडगे बाबांनी गरिबांसाठी, दलितांसाठी, दुःखितांसाठी, देवभोळ्या आणि आंधळ्या-पांगळ्या झालेल्या हीन, दीन समाजाच्या उद्धारासाठी आर्थिक समतेचा संदेश अतिशय महत्त्वाचा आहे. कम्युनिस्टांना आणि समाजवाद्यांना वाटते की, समतेचा संदेश भारतीय जनतेला आम्हीच दिला आणि आम्हीच सध्या तो देत आहोत. माक्र्स हा माणूस आहे की, माकड आहे हे देखील गाडगे बाबांना ठाऊक नाही. पण गेली अनेक वर्षे मार्क्सवादाची शिकवणूक गाडगे बाबांनी महाराष्ट्रातील जनतेला दिली. गाडगेबाबा हे महाराष्ट्रातील समाजवादाचे आर्थिक समतेचा विचार मांडणारे पहिलेच संत आहेत. व्यवहारी जीवनाचे तत्त्वज्ञान, जीवन जगण्याची रित त्यांनी समाजाला सांगितली व त्यांचे सामाजिक, आर्थिक प्रबोधन घडवून आणण्याचे कार्य जीवनभर केले. गाडगेबाबा हे वृत्तीनं जसे संत होते, इतर संतांतील व त्यांच्यातील लक्षात घेणे समाजसुधारकही होते. इतर संतांतील व त्यांच्यातील हा फरक विशेष लक्षात घेणे आवष्यक आहे. म्हणून त्यांना ग्राम स्वच्छता अभियानापुरते मर्यादित करुन चालणार नाही तर त्यांचे संपूर्ण कार्य समाजासमोर येण्याची आज नितांत गरज निर्माण झाली आहे.

भारतातील 48 टक्के लोक कमावतात व 52 टक्के त्यांच्या जीवावर बसून खातात. हे देशाचे आजचे वास्तव चित्र आहे. गाडगे बाबांना ऐदी भिकारी पोसणं मुळीच मान्य नव्हतं. श्रमाला प्राप्त झाली पाहिजे, फुकटखाऊ वृत्ती ही या समाजाला व देशाला विनाशाकडे अनेक वाईट गोष्टींकडे घेऊन जाते. म्हणून 'रिकामे हात' ही या देशातील आर्थिक समस्या आहे. तशीच वाढती लोकसंख्या ही तर फारच उग्र समस्या आहे. भारताची लोकसंख्या प्रचंड वाढत आहे. आज प्रत्येक ठिकाणी लोकसंख्यावाढीचे वाईट परिणाम जाणवत आहेत. अगदी थोडक्यात असे म्हणता येईल की, लोकसंख्यावाढ ही आजच्या सर्व समस्यांचे मूळ आहे. म्हणून कुटुंब नियोजनाचे महत्त्व समाजाला पटवून देण्याचा प्रयत्न गाडगे बाबांनी आपल्या कार्यातून सतत केला, सामाजिक हित लक्षात घेऊनच ते थांबले नाहीत तर सामाजिक हिताबरोबर देशहिताचा विचार त्यांनी समाजाला दिला. गरिबी, श्रीमंती, श्रेष्ठ, कनिष्ठ अशी समाजातील विषमता नष्ट झाली पाहिजे. समता समाजात कशी आणता येईल याकरिता ते वाढत्या लोकसंख्येचा विषय समाजाच्या लक्षात आणून देताता व समाजाचे लक्ष या गंभीर समस्येकडे वेधून त्या समस्येला प्रतिबंध करण्यासाठी कुटुंबकल्याणाचे महत्त्व समाजाला पटवून देत होते.

## चमत्कार व जादूटोणाचा विरोध

चमत्कार व जादूटोण करणा-यांची व त्यावर विश्वास ठेवणाऱ्यांची बाबा कीर्तनातून टर उडवत. चमत्कार करणा-यांवरही बाबा हल्ला चढवित. आताच येथे होता. आणि आता त्या दूरच्या गावात दिसला असे सांगणाऱ्यांचा खरपूस समाचार घेत. हे सारे खोटे आहे. यावर विश्वास ठेवू नका असे आवाहन ते लोकांना करीत. बाबा कीर्तनानंतर गायब होतात व लगेच दुसऱ्या गावी अवतरतात अशीही अफवा पसरविण्यात आली होती. लोक यालाही चमत्कार मानायला लागले होते. यामुळे गाडगे बाबांना या लोकांना पटवून द्यावे लागले की, मी कोणताही चमत्कार करीत नाही, आणि गायबही होत नाहीत तर तुमच्यापासून सुटका करण्यासाठी कीर्तन झाल्यानंतर बाजूलाच कुठेतरी घोंगडी पांघरुन बसून राहाते. लोकांना या चमत्कारापासून व जादूटोण्यापासून मुक्त करण्यासाठी बाबा सारखे त्यांना कीर्तनातून उपदेश करुन त्याचे प्रबोधन साधण्याचा प्रयत्न करत होते.

**हिंसाबंदी**

महाराष्ट्रभर हजारो देवी-देवतांचे मंदिरे. अगदी पर्वतांच्या शिखरांपासून तर दऱ्या-खोऱ्यांपर्यंत आणि नदीतीरापासून तर तलावाच्या किनाऱ्यापर्यंत सर्वदूर देवी-देवता विराजमान झालेले. यातले काही देव शाकाहारी तर काही देव मांसाहारी. (शाकाहारी म्हणजे बळी न मागणारे आणि मांसाहारी म्हणजे रक्तांचे नैवद्य मागणारे) मांसाहारी दैवतांमध्ये खंडोबा, म्हसोबा, विरोबा, पीर, मरी आई, मातामाय, मानाई, झोलाई, आणि अनेक देवी देवता व त्यांची शेकडो ठिकाणे. गाडगे बाबांनी अनेक यात्रेच्या ठिकाणी शेकडो प्राण्यांचे आणि पशुंचे बळी व रक्तांचे लोटही पाहिले होते. यामुळे ही हिंसा थांबली पाहिजे व पशु-पक्षांचा जीव वाचला पाहिजे अशी त्यांची प्रामाणिक इच्छा होती. देवी देवतांना कोंबड्या-बकऱ्यांचा बळी दिल्यास ते प्रसन्न होतात व आपले नवस पूर्ण होतात हा लोकांचा समज म्हणजे निव्वळ अंधश्रद्धा आहे असा गाडगे बाबांचा ठाम विश्वास होता.

यासाठी गाडगे बाबा यात्रेच्या ठिकाणी जात व कीर्तनातून लोकांना समजावून सांगत की, बळी दिल्याने देव पावत नाही व आपले कार्यही सफल होत नाही. यासाठी संतांची वचने, कबीरांचे दोहे यांचा वापर करुन लोकांना पटवून देत. गाडगे बाबांचा हा उपदेयर लोकांच्या हृदयाला भीडे. ते अंतर्मुख होऊन विचार करायला लागत.

कोण्या यात्रेत पशुहत्या होत आहे असे कळताच कधी गाडगे बाबा तर कधी त्यांचे अनुयायी धावून जात व लोकांचे प्रबोधन करुन हिंसाबंदी घडवून आणत. परंतू हे कार्य साधे नव्हते. लोकांच्या मनात खोलवर रुजलेली व देवर धर्माशी संबंधीत असलेली ही प्रथा दूर करण्यासाठी बाबांना अतोनात श्रम करावे लागले. बरेचदा एकाकी झुंज द्यावी लागली, तरी ते डगमगले नाही. आणि हळूहळू लोकांमध्ये जागृती होऊ लागली.

**संत गाडगे बाबांचा व्यसन मुक्तीचा संदेश**

गाडगे बाबांचे वडील व्यसनाच्या आहारी गेल्यामुळे आपला जीव गमावून बसले होत, आणि दारुमुळे त्यांचा संसार उद्धस्त झाला होता. याची जाणी बाबांना होती स्वतः त्यांनी खेड्यापाड्यातील सामान्य माणसांचे जीवन बघितले होते. दारुमुळे अनेकांचे संसार उद्धस्त होत होते, हे ते स्वतः पाहत होते. त्यामुळे दारुपासून समाज मुक्त झाला पाहिजे यासाठी त कीर्तनातून उपदेश करीत.

गाडगे बाबा आपल्या कीर्तनातून दारु पिणाऱ्यांवर अधिक हल्ला चढवायचे. आधिच अठराविश्व दारिद्रय आणि त्यात हे दारुचे व्यसन. यामुळे बहुजन समाज उद्धस्त होत आहे. यामुळे हे कुठेतरी थांबले पाहिजे यासाठी त्यांची ही तळमळ होती. त्यांना दारुच नाही तर कोणतेही व्यसन आवडत नव्हते. विडी ओढणे, भांग खाने, गांजा पिणे, तंबाखू खाणे या गोश्टीही त्यांना आवडत नसत. त्यांच्या अनुयायांपैकी जर कुणी एखादे व्यसन करताना दिसला की, भरी कीर्तनात त्याला उभे करुन बाबा त्याचा समाचार घेत.

**सारांश-**

समाजातील वाईट गोष्टी बंद करण्यासाठी गाडगे बाबांनी त्यावर प्रहार केले. समाजाला अज्ञानाच्या अंधारातून प्रकाशात आणण्यासाठी आपले आयुष्य वेचले. असे अनोखे समाजकार्य करु समाजाचे सामाजिक व आर्थिक प्रबोधण करणारा संत भाराताच्या इतिहासात सापडत नाही. संत गाडगे बाबा हे एक आदर्श आहेत. आधुनिक काळातील ज्या समस्यांनी उग्र रुप धारण केले आहे. त्याबाबत त्यांनी वारंवार आपल्या जनसमुदायाला सचेत करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या कार्याचा अभ्यास हा कधीही न संपणारा आहे. गाडगे बाबांच्या विचारांची अंमलबजावणी करणे हे प्रत्येक नागरीकांचे कर्तव्य आहे. नव्हे हे कार्यप्रत्येकाने चोखपणे केल्यास समाजिक समस्यांचा नायनाट झाल्याशिवाय तसेच जग विज्ञानवादी झाल्याशिवाय राहणार नाही.

**संदर्भ ग्रंथ**

1. ठाकरे प्रबोधनकार, श्री गाडगेबाबा, श्री गाडगेबाबा प्रकाशन समिती, मुंबई.
2. सावरकर सुदाम, तपोमूर्ती श्री गाडगेबाबा, साहित्यप्रभा प्रकाशन, अमरावती.
3. तायडे मनोज (1992), कर्मयोगी गाडगेबाबा, लोकवाड्.मय गृह, सयानी रोड.- मुंबई.
4. भगत रा.तु. (2000), घरोघरी गाडगेबाबा, सिध्दराज प्रकाशन, पुणे.
5. केचे मधकर, संत गाडगेबाबा, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
6. मेहता देवव्रत, महाराष्ट्र, जुलै 10, 1977, संत गाडगेबाबा जनशताब्दी विषेशांक, सुचना व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.